बुधवार दि.२५ सप्टेंबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : २३
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक
बीड
# लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in


## ‘तिजोरीत नाही आणा, तरी मला बाजीराव म्हणा’

# निवडणुकीत सत्तांतर होईलच; नंतर ऑडिट करण्याचा ठाकरे गटाचा इशारा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

आर्थिक शिस्तीच्या बाबतीत दाखवलेल्या अकलेच्या दिवाळखोरीमुळेच मिंध्यांचे सरकार दिवाळखोरीत निघाले आहे. तिजोरीतील खडखडाटाने राज्यातील विविध विकासकामांची तब्बल ३६ हजार कोटींची बिले थकली आहेत. महाराष्ट्राची सत्ता जशी ओरबाडून मिळवली त्याच पद्धतीने राज्याची तिजोरी ओरबाडण्याचे कामही अनेक हातांनी सुरू आहे. तोंडावर आलेल्या विधानसभेच्या निवडणुकीत सत्तांतर होईलच; तेव्हा नव्या सरकारला पहिले काम या लुटालुटीच्या ऑडिटचेच करावे लागेल! असा इशाराच उद्धव ठाकरे गटाने सामनाच्या माध्यमातून दिला आहे.आर्थिक शिस्तीचे पालन करणारे राज्य ही महाराष्ट्राची ओळख मिटवून टाकण्याचा विडाच राज्यातील मिंध्यांच्या सरकारने उचललेला दिसतो आहे. केवळ विडाच उचलला असे नव्हे तर राज्याची अर्थव्यवस्था रसातळाला नेऊन आर्थिक शिस्तीचे राज्य ही ओळख पुसून टाकण्यात मिंध्यांची राजवट दुर्दैवाने यशस्वी झाली आहे. ऋण काढून सण साजरे करण्याच्या अनिष्ट वृत्तीमुळे राज्याची आर्थिक शिस्त संपूर्णपणे कोलमडली व सरकार पुरते कंगाल झाले. आता तर परिस्थिती इतकी बिकट बनली आहे की, विकासकामांवर खर्च करण्यासाठी सरकारकडे छदामही उरला नाही. तिजोरीत खडखडाट झाल्याने राज्याच्या विविध भागांत सुरू असलेल्या विकासकामांची तब्बल ३६ हजार कोटी रुपयांची बिले थकली आहेत. सरकार दिवाळखोरीत निघाल्याचाच हा पुरावा आहे.महाराष्ट्राच्या डोक्यावरील कर्ज या सरकारने ८ लाख कोटींवर नेऊन ठेवले. सरकारच्या उत्पन्नातील बहुतांश रक्कम या कर्जाचे व्याज फेडण्यात जात असल्याने तिजोरीत काही शिल्लकच उरत नाही, अशी अवस्था आहे. तरीही राज्याची आर्थिक घडी उद्ध्वस्त झाल्याचे हे वास्तव लपवून मिंध्यांचे सरकार निवडणुकीच्या तेंडावर रोज नवनव्या फुकटछाप घोषणांचा पाऊस पाडत सुटले आहे. ‘तिजोरीत नाही आणा, तरी मला बाजीराव म्हणा’ अशी या सरकारची दुर्गती झाली आहे. सरकार व मंत्रालयाचे उंबरठे झिजवून राज्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंते व कंत्राटदारांनी विकासकामांची कंत्राटे मिळवली, पण कामे पूर्ण झाल्यानंतरही या कामांची हजारो कोटींची बिले सरकारने थप्पीला लावून ठेवली आहेत. बिलांच्या थकबाकीने हवालदिल वगैरे झाल्याने अभियंते, कंत्राटदार सरकारविरुद्ध शड्डू



ठोकण्याच्या विचारात असल्याची बातमी आहे. सरकारच्या तिजोरीत खडपूही शिल्लक नाही. त्यामुळे कंत्राटदारांना या कामांची बिले मिळतील तरी कशी? राज्याच्या सर्व भागांत पायाभूत सुविधांच्या विकासाची कामे कशी जोरात सुरू आहेत, असे ढोल सरकारने मोठ्या थाटात बडवून घेतले; पण या कामांसाठी खर्च झालेले पैसे देण्यासाठी मात्र सरकारकडे फंड उपलब्ध नाही. विभागांसाठी मंजूर झालेला व उपलब्ध असलेला निधी किंवा कुठल्याही आर्थिक बाबींचा आगापिछा न पाहता सरकारच्या पाठीराख्यांना खूश करण्यासाठी होलसेलात कामे काढण्यात आली. वरील सर्व विभागांमध्ये भरमसाट निविदा काढून मर्जीतील लोकप्रतिनिधींना वा लोकप्रतिनिधींची मर्जी सांभाळण्यासाठी खिरापत वाटावी अशा पद्धतीने कामांचे वाटप करण्यात आले. तथापि, आता कामे पूर्ण झाल्यावर मात्र निधीअभावी सरकारने ही बिले अडकवून ठेवली आहेत. त्यामुळे राज्यातील कंत्राटदार महासंघाने सरकारविरुद्ध आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. अशा प्रकारच्या कामांमध्ये सरसकट सर्वच कंत्राटदारांना सहानुभूती दाखवावी अशीही परिस्थिती नाही. कारण मिंध्यांच्या विद्यमान खोकेशाहीत विकासकामांची अंदाजपत्रके कशी फुगवली गेली हे काही आता लपून राहिलेले नाही.केवळ या विकासकामांचीच बिले या सरकारने थकवली असे नव्हे. गतवर्षी मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृत महोत्सवानिमित्त छत्रपती संभाजीनगरात मंत्रिमंडळाची खास बैठक घेऊन मराठवाड्यासाठी ४६ हजार कोटींच्या वेगवेगळ्या कामांच्या घोषणा मिंधे सरकारने केल्या होत्या, मात्र या ४६ हजार कोटींपैकी ४६ पैसेही सरकार गेल्या वर्षभरात खर्च करू शकले नाही. सरकारच्या तिजोरीची ही अशी दुरवस्था या अलिबाबा सरकारने करून ठेवली आहे. चौफेर लुटमार हेच त्याचे कारण आहे. ८ लाख कोटींचे कर्ज व तिजोरीची कंगाल अवस्था झाली असतानाही ‘लाडकी बहीण’ व ‘लाडका भाऊ’ यासारख्या योजना राबवून ‘लाडकी खुर्ची’ वाचवण्याची अखेरची धडपड मिंधे मंडळ करीत असले तरी त्यांना त्यात यश येणार नाही. आर्थिक शिस्तीच्या बाबतीत दाखवलेल्या अकलेच्या दिवाळखोरीमुळेच मिंध्यांचे सरकार दिवाळखोरीत निघाले आहे. तिजोरीतील खडखडाटाने राज्यातील विविध विकासकामांची तब्बल ३६ हजार कोटींची बिले थकली आहेत. महाराष्ट्राची सत्ता जशी ओरबाडून मिळवली त्याच पद्धतीने राज्याची तिजोरी ओरबाडण्याचे कामही अनेक हातांनी सुरू आहे. तोंडावर आलेल्या विधानसभेच्या निवडणुकीत सत्तांतर होईलच; तेव्हा नव्या सरकारला पहिले काम या लुटालुटीच्या ऑडिटचेच करावे लागेल!

## राज्यस्तरीय तेंग सु जो स्पर्धेमध्ये अहमदनगर जिल्हा दुतियास्थानी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

तेंग सु डो स्पोर्ट असोसिएशन अहमदनगर व महाराष्ट्र तेंग सु डो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ११वी राज्यस्तरीय स्पर्धा शिर्डी येथे दि.२०ते२२सष्टेबर २०२४रोजी संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये १६ जिल्ह्यांतील ३५० खेळाडु सहभागी झाले होते. या स्पर्धेचे उद्घाटन नगरसेवक..श्री.शेळके साहेब, ऋषिकेश बनकर (उद्योजक) शिर्डी वाहतुक अधिकारी .पो.निरीक्षक.श्रीसुभाष बोडके, .श्री. नवनाथ. सोनवणे, रॉकी डिसोझा, सुभाष मोहिते ,प्रशांत गावकर यांच्या उपस्थितीत उद्घाटन समारंभ पार पडला. या स्पर्धेत प्रथम क्रमांक ठाणे जिल्हा, द्वितीय क्रमांक अहमदनगर व धुळे जिल्हा तर तृतीय क्रमांक सांगली जिल्हा यांनी पटकाविला. स्पर्धा आयोजन करण्यात संकल्प स्पोर्ट्स फाऊंडेशनच्या सर्व स्वयंसेवकांनी मोलाची कामगिरी बजावली. संघटनेचे पदाधिकारी चंद्रकांत राहिंज सर यांच्या परिश्रमातून स्पर्धा अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाल्या . यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## कोणी रस्ता देता का रस्ता रस्त्या अभावी वृद्धांची व विद्यार्थ्यांची हेळसांड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मंठा । प्रतिनिधी**



मंठा तहसीलदार यांना निवेदन देताना गावकरी

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत केंधळी ते हातवन बायपास रस्त्याचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित आहे ह्या रस्त्याकडे कोणत्याही प्रतिनिधीचे लक्षण आहे केंद्रित वन हा रस्ता जवळपास ९० टक्के पूर्ण झालेला आहे मध्यभागी काही शेतकऱ्यांनी तो रस्ता अडवल्यामुळे वयोवृद्ध व विद्यार्थ्यांची हेळसांड होत आहे. पर्याय म्हणून केंधळी गावातून येजा करावी लागते कित्येक वेळेस वाद विवाद झालेला आहे. कित्येक वेळेस संबंधित कार्यालयाला व लोकप्रतिनिधीला या प्रकरणाविषयी वारंवार विचारणा केली असता सर्वांनी उडवाउडवीची उत्तर दिले आहे मध्यभागी रोडवर केलेले अतिक्रमण काढण्यासाठी प्रशासनानी वेळ काढु पणाची भुमीका बजावली वास्तविक पाहता हा रस्ता शासकीय आहे त्यावर कोणाचाही अधिकार नाही काही लोकांनी शासकीय यंत्रणेस काम बंद पाडण्यास मज्जाव केला आहे याप्रकरणी दोन्ही गावांतील लोकांनी संबंधित लोकांना समजावून सांगितले असता ते कोणाचेही ऐकत नाही.ह्या रस्त्याचे भिजत घोंगडे आहे.ह्या रस्त्यामुळे हातवण गावचा विकास खुटला आहे रस्ता नसल्यामुळे अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे . शासकीय रेकॉर्ड नुसार रोड ची नकाशा प्रमाणे आहे मग आडवा आडवी कसासाठी प्रशासनाने रोडची पाहणी करून संबंधित ठेकेदारांना काम करण्याच्या सूचना द्याव्या व पोलीस यंत्रणाला घेऊन रोड खुला करून द्यावा नसता लोकशाही मार्गाने तहसील कार्यालयासमोर अमर उपोषण करण्यास भाग पडू नये.

### श्रीमती वच्छलाबाई शालीग्राम तायडे यांच्या वाढदीवसा निमित्त

## मोफत नेत्र तपासणी शिबिरा सह विविध कार्यक्रम संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**



नायदेवी येथील ग्रामपंचायत सरपंच श्रीमती वच्छलाबाई शालीग्राम तायडे यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये वंचीत बहुजन आघाडी चे नेते मा. साहेबराव तायडे, जिल्हा नेते प्रशांतभाऊ वाघोदे, वंचित नेते नागवंशी संघपाल पनाड, माहिला आघाडी जिल्हाध्यक्ष विशाखा ताई सावंगी ड.ईखारे, ड.भोजने,कैलास फाटे, दिनकर देशमुख,वंचित बहुजन आघाडी बुलढाणा शहर अध्यक्ष मिलिंद वानखेडे, चिखली ता. अध्यक्ष संजय धुरंदर,शे. अख्तर भाई,महिला नेत्या इंगळे ताई, कोथळी सरपंच मुकेश इंगळे, वकील भाई,उपसरपंच अरविंद खंडारे; व कार्यकर्ते जगदिश तायडे, शिवचरण दिवाणे, रवि तायडे, पंकज तायडे, नागसेन तायडे, इश्वर शिरसाठ, सुनिल तायडे मोहनराव नारायण नेत्रालय नांदूरा चे डॉक्टर व कर्मचारी इत्यादींचे सहकार्य लाभले या शिबिरात गावतील बरेच नागरीक सहभागी झाले होते.

## अपूर्वा मतिमंद विद्यालय सेनगाव व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मूकबधिर विद्यालयात टी-शर्ट वाटप





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव शहरातील राजे शिवाजी गणेश मंडळाच्या वतीने दिनांक २४सप्टेंबर रोजी अपूर्वा मतिमंद विद्यालय सेनगाव व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मूकबधिर विद्यालय सुकळी फाटा येथे टी-शर्ट वाटप करून विद्यार्थ्यांना नाष्टा व फळाची वाटप करण्यात आली, यावेळी उपस्थित सेनगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे उपपोलीस निरीक्षक घारगे साहेब, मेडिकल असोसिएशनची अध्यक्ष विजेय शिंदे, डॉक्टर असोशियन चे अध्यक्ष सतीश राव देशमुख डॉक्टर हजारे, डॉक्टर बुकशेटवार, व राज्य शिवाजी गणेश मंडळाचे सर्व सदस्य यांच्या उपस्थितीमध्ये विद्यार्थ्यांना टी-शर्ट नाष्टा व फळे वाटप करण्यात आली होती,

झाडे लावा
झाडे जगवा

### चारोळी

मनात संकल्प धरूनी
कार्य सिद्धीस न्यावे
यशाची फळे मिळत राहतील
मनमुराद ती चाखून पहावे.

रंजना सानप
मायणी (सातारा)

## जाफ्राबादला सरकारच्या प्रतिकात्मक पुतळ्याच दहन,आंदोलकांवर पोलीसांची दडपशाही

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

मराठासंघर्षयोद्धे मनोज जरांगे पाटील यांचे सात दिवसापासुन अमरण उपोषण चालु असुन जरांगे पाटलांची तब्येत अत्यंत खालावली आहे तरीही शासन कुठल्याही प्रकारची हालचाल करतांना दिसत नाही उपोषण सोडवण्यासाठी शासनस्तरावर कुठल्याही प्रकारची प्रक्रिया करतांना दिसत नाही या गोष्टीचा निषेध म्हणून जाफ्राबाद येथे छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ मराठासेवक विकास जाधव आणि सुनिल पंडित यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करून निषेध व्यक्त केला.

यावेळी आंदोलकांवर पोलीसांनी दडपशाही करून त्यांना खेचत पोलीस व्हॅनने पोलीस स्टेशनला नेले व अटक करण्यात आली.पोलीसांच्या या दडपशाहीचा विविध स्तरातुन निषेध होत असुन ऐकीकडे जरांगे पाटलांच्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करुन सरकारने झोपेचे सोग घेतलय तर दुसरीकडे आंदोलनांवर दडपशाही करुन आंदोलन दाबण्याचा केविलवाणा प्रयत्न पोलीसांकडुन होतय असच चित्र निर्माण झाले आहे.



# युवा संत कर्ममेळा यांच्या अभंगातील विद्रोह!

वारकरी संप्रदायाचा इतिहास मोठा विलोभनीय आणि महाराष्ट्राच्या सर्वकाळ जडणघडण, बांधणीसाठी मोलाचा आहे. वारकरी संप्रदायाने इथल्या प्रस्थापित रूढी, परंपरा, जातीभेद, वर्ण भेद, लिंग भेद इत्यादी विरोधात फार मोठी वैचारिक क्रांती घडवून आणली आहे. वर्णव्यवस्था समूळ उच्चाटन करण्याचे आणि खरा मानवधर्म रुजविण्याचे महत्कार्य सर्वच वारकरी संतांनी केले आहे. प्रस्थापितांनी क्रांतीचा विचार मांडणाऱ्यांना संपविण्याचा सतत प्रयत्न केला आहे. उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्त्री-पुरुष आणि वर्ण व्यवस्था वारंवार रुजवण्यासाठी प्रयत्न झाले. त्यात त्यांनी बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवरायांना सुद्धा सोडले नाही! हे फार मोठे दुर्दैव म्हणावे लागेल. वारकरी संप्रदायातील जवळपास सर्वच संत, कवी, विचारवंत हे तथाकथित क्षुद्र, अतिक्षुद्र वर्णातून येतात. त्याला संत ज्ञानदेव हे जरी जन्माने ब्राह्मण असले तरी त्यांना शुद्धिपत्र नाकारल्यामुळे ते ही क्षुद्रच गणले जातात. वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी आपली वेगळी क्रांतिकारी, वैचारिक चूल मांडलेली दिसते. वेद वाचणे आणि ब्रह्मज्ञान सांगण्याचा अधिकार शुद्रातीशुद्रांना नसल्यामुळे या संतांनी वेदांच्या नादी न लागता आपला एक स्वतंत्र वैचारिक वेदमार्ग निर्माण केला. नाही तरी विनोबा भावे म्हणतात, वेद हे अतिप्राचीन आदिवाशींचे अलौकिकवाङ्मय आहे.ती सुद्धा इथली आद्य लोकांनी अनुसरण केलेली आणि लोकमान्य झालेली एक निसर्गमान्य विचारधाराच आहे. वेद म्हणजे जाणणे. ते इथल्या अधिवाशी लोकांनी लिहिले. वेद अपौरुषीय आहेत हे पटत नाही. जगात काहीही अपौरुषीय असूच शकत नाही. असो.

वारकरी लेखन परंपरेचा इतिहास काही फार प्राचीन नाही. इसविसन पूर्व काळातील कन्फ़्युसिअस, सॉक्रेटिस, ताओ, बुद्ध आदींचेवाङ्मय जर आज जिवंत असेल तर तेरा-चौदाव्या शतकात निर्माण झालेले लेखन तर ताजे आहे असे म्हणणे वावगे ठरू नये. तेराव्या-चौदाव्या शतकातील महानुभाव श्री चक्रधर स्वामी, वारकरी सर्व संत सावतोबा, नामदेव, जनाबाई, ज्ञानदेव, गोरोबा, चोखोबा, सोयराबाई, मुक्ताई, निर्मळा आदि संतांचे अभंग वाङ्मय मोलाचे आणि तत्कालीन परिस्थिती हुबेहूब वर्णन करणारे आहे. या सर्वच संतांच्या अभंगातून तत्कालीन सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, वैचारिक परिस्थिती सहज लक्षात येते. असे असले तरी यातील सर्वांच्या अभंग अनुभूती मात्र भिन्न भिन्न आहेत. परिणामी त्यांच्या अभंग कक्षा आणि विषयही भिन्न भिन्न आहेत. यातील प्रत्येक संत वाङ्मय आणि त्याचे जीवन, चरित्र हा स्वतंत्र अभ्यासाचा क्रांतिकारी विषय आहे. सुरुवातीच्या सर्व संतांच्या मांदियाळीतील संत चोखोबाराय आणि त्यांचे सर्व कुटुंब विशेष चिंतनाचा विषय आहे. चोखामेळा, पत्नी सोयराबाई, बहिण निर्मळा, मेव्हणा बंका आणि चोखा-सोयरा पुत्र कर्ममेळा या सर्वांचे मिळून उणेपुरे ५०१ अभंग सापडतात. त्यात सर्वात जास्त अभंग चोखोबांनी लिहिले असून त्यानंतर सोयराबाईचा नंबर लागतो. या दांपत्यापोटी आलेले पुत्ररत्न कर्ममेळा सुद्धा अभंग लेखन करतो हे मोठे क्रांतिकारी आणि आजच्या उच्च शिक्षित, साधनांनी ओतप्रोत असणाऱ्या माणसांना अवाक् करणारे आहे! तुलनात्मक दृष्टीने या सर्वांचे अभंग वाचले असता, युवा संत कर्ममेळा सर्वांपेक्षा वेगळे लिहितांना दिसतो आहे.

युवा संत कर्ममेळा हा एक क्रांतिकारी युवा वारकरी असून सर्वकाळ युवकांचा तो प्रेरक ठरू शकणारा सृजन आहे. त्याच्याकडे अलौकिक प्रतिभा शक्ती आहे. विद्रोह आहे, बंड करून उठण्याची उर्मी त्याच्या ठायी जाणवते. आपण कुठे जन्माला आलो आहोत त्याला याचे भान असून कर्ममेळा आपल्या आई-वडीलांच्या लेखनाची वाट चोखाळतांना दिसत नाही. त्याने आपल्या कुटुंबाचा छळ जवळून अनुभवला आहे. कर्माकडे शोशिक वृत्ती नाही. बडव्यांनी वडिलांना मंदिरासमोर बांधून मारतांना त्याने पाहीले होते. तरी पण सोयरा आणि चोखोबा आपल्या अभंगातून बडव्यांना सरळ विरोध न करता ते पती पत्नी आपली अभंग कैफियत पांडुरंगाकडे मांडतांना दिसतात. त्यानंतर श्री विठ्ठल चोखोबांच्या घरी जेवायला आल्याच्या आख्यायिकांची लोक चर्चा करत. आपले आई-वडील पांडुरंगाची भक्ती करून अभंग लिहितात. आपले पालक जे करतात त्या पावलावर पाऊल टाकण्याचे काम मुलं करत असतात. कर्म मेळा सुद्धा अभंग लिहायला लागला. त्याचे एकूण २७ अभंग असून त्यातील भक्ती, ज्ञान, वैराग्य, संत महिमा दर्शवणारे अभंग जास्त नाहीत. त्यातील २५ अभंग हे श्री विठ्ठलाला आपली जात, उपेक्षा, आई-वडिलांचा छळ, अवहेलना इत्यादी दृष्टीकोनातून प्रश्न विचारणारे आहेत. कर्म मेळा प्रश्न विचारतांना पांडुरंग हे प्रतिक समोर ठेऊन प्रश्न विचारतांना दिसतो. त्यातील

वायां तोंडपिटी करा कशासाठी।तुमची तो रहाटी कळों आली।।(कर्ममेळा, १)
आमुचा बाप तुझा पोसणा।कां हो नारायणा विसरसी।।
(कर्ममेळा, ३)
आमुची केली हीन याती।तुज कां न कळे श्रीपती।।
जन्म गेला उष्टे खातां।लाज न ये तुमचे चित्ता।।
(कर्ममेळा, ५)

ह्या काही निवडक, प्रातिनिधिक अभंग ओळी लक्षपूर्वक वाचल्या आणि त्यावर सखोल चिंतन केल्यास आपल्याला युवा संत कर्ममेळा यांच्या लेखन, विचारांची बैठक आणि सुर लक्षात आल्याशिवाय रहात नाही.

तत्कालीन महार जमातीत, एका वारकरी भजन, कीर्तन, अभंग लेखन करणाऱ्या दांपत्याच्या घरात जन्मलेला युवा संत कर्ममेळा मोठा विलक्षण बुद्धिमान कवी आहे. त्याला त्याच्या मर्यादा चांगल्या माहिती झाल्या होत्या. प्रस्थापित व्यवस्थेला तो सरळ सरळ भिडू शकत नाही. तत्कालीन समाजाने वर्णव्यवस्था, सामाजिक उतरंड आणि भेदाभेदाचा कळस गाठलेला असतांना युवा कर्ममेळा आपले क्रांतिकारी विचार सांगून किंवा व्यवस्थेविरुद्ध त्याचा आवाज क्षीण झाला असता. आपल्या बापासारखा व्यवस्थेसी थेट पंगा घेऊन अनमोल जीव गमावण्यापेक्षा त्याने आपल्या विद्रोही शब्दांना श्री विठ्ठलाला संबोधून बोलायचे ठरवले. कर्ममेळा विठ्ठलाला बोलतांना तत्कालीन जग रहाटी, पोट पोसणा, लाज न ये तुमच्या चित्ता सारखे जे जे संबोधन कर्ममेळा वापरतो तो अप्रत्यक्षपणे तत्कालीन सर्व प्रस्थापित जाती-जमातीच्या वर्गाला आणि लोकांना उद्देशून आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. युवा संत कर्ममेळा यांचे अभंग रोखठोक आणि सडेतोड आहेत. त्याचे शब्द आणि प्रश्न टोचणारे, बोचणारे आहेत. त्यातील विद्रोह बोचरा आहे. व्यवस्थेला छेद देणारा आहे. संत जनाबाईंच्या विद्रोहाची भाषा युवा संत कर्ममेळा बोलतांना दिसतो. सरळ देवाशीच दोन हात करण्याची भाषा बोलतांना त्यांच्यातील आद्य क्रांतिकारक युवा संताची सहजच ओळख होऊन जाते. वारकरी संतांनी व्यवस्थेला छेद देणारी मूलगामी वैचारिक क्रांती केली हे महत्वाचे वाटते. सृजनहो, संत चोखामेळा, पत्नी संत सोयराबाई, मुलगा कर्ममेळा, बहिण निर्मळा, मेव्हणा बंका हे सर्वच खूप सुंदर अभंग लेखक होते. एका कुटुंबातील या पाचही उपेक्षित, दुर्लक्षित कवींचे अभंग वाचतांना वर्तमानात आपल्या सर्वांनी बोध घेतला पाहिजे. गप्पा, चॅटिंग, सर्फिंग करत केवळ मेसेजेस फॉरवर्ड करण्यापेक्षा आपल्या भोवताल समाजात घडणाऱ्या घडामोडी, आपल्या जीवनात येणारे परिवर्तनशील विचार, राजकारण, निसर्ग याचे सूक्ष्म निरीक्षण करून त्यावर लिहले पाहिजे. अशी कृती करून आपल्या शिक्षण आणि ज्ञानाचे परिमार्जन करण्याचा प्रयत्न करावा आणि प्रतिभेला फुलवावे!

प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये
कै.रमेश वरपुडकर
महाविद्यालय,सोनपेठ
जि. परभणी (महाराष्ट्र)
मो.९१५८०६४०६८

# उर्दू टीचर्स असोसिएशन तर्फे पुसदचे सैय्यद सलमान सन्मानित

## शैक्षणिक कार्यासाठी अमरावतीत शिक्षक आमदार किरण सरनाईक साहेबांच्या हस्ते सत्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

पुसद । सय्यद रहीम राजा

उर्दू टीचर्स असोसिएशन, अमरावती विभागाच्या वतीने आयोजित एक दिवसीय अधिवेशन रविवारी मोठ्या उत्साहाने संपन्न पार पडला. या अधिवेशनात उर्दू शिक्षक व शिक्षणाच्या समस्यांवर, शिक्षण पद्धतीच्या सुधारणा, आणि शिक्षकांच्या व्यावसायिक विकासावर सखोल चर्चा करण्यात आली. या विशेष कार्यक्रमात शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवरांनी हजेरी लावली या मध्ये अमरावतीची आमदार सौ.सुलभाताई खोडके, अमरावती विभागाचे शिक्षक आमदार श्री.किरण सरनाईक साहेब, संत गाडगे बाबा




अमरावती विद्यापीठचे कुल सचिव श्री.अविनाश असणारे साहेब अब्दुल राजिक माजी शिक्षणाधिकारी साहेब अमरावती,उर्दू टीचर्स असोसिएशन अमरावती विभाग अमरावतीचे अध्यक्ष गाझी जाहेरोश सर उपस्थित होते. याच कार्यक्रमात वेग वगळया क्षेत्रात कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.यामध्ये गुलाम नबी आझाद उर्दू हायस्कूल पुसदचे सैय्यद सलमान सैय्यद शेरू सरांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्यासाठी तसेच त्यांना मिळालेल्या राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी उर्दू टीचर असोसिएशन तर्फे कार्यक्रमाचे अध्यक्ष अँड.किरण सरनाईक साहेब तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अमरावती शहरातील आमदार सौ.सुलभाताई खोडके तसेच अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव मा.अविनाश असणारे सर यांच्या हस्ते शाल,पुष्पगुच्छ, ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी सलमान सरांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याची प्रशंसा केली.तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सैय्यद सलमान सरांनी त्यांना सन्मानित केल्या बद्दल उर्दू टीचर्स असोसिएशनचे विभागीय अध्यक्ष गाझी जहेरोश सरांचे तसेच उर्दू टीचर्स असोसिएशनचे आभार व्यक्त केले.

# चकलांबा पोलिसांची आणखी एक धडाकेबाज कारवाई, रिक्षात तलवारी वाहून नेणारा अटक, १८ हजाराचा मुद्देमाल जप्त

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

गेवराई । प्रतिनिधी

चकलांबा पोलीस स्टेशन अंतर्गत उमापूर दूरक्षेत्र येथे ठाणे प्रभारी अधिकारी नारायण एकशिंगे यांना गोपनीय बातमीदार मार्फत बातमी मिळाली की इसम नामे रतन देवराव पवार वय ४३ वर्ष हा रिक्षामध्ये तलवारी घेऊन जाणार आहे. त्यानुसार सापळा रचला असता रिक्षा क्रमांक चक १६ -उ ४१६ ही रिक्षा गेवराईकडे जात असताना चेक केले असता त्यामध्ये आठ तलवारी मिळून आल्या त्यास त्याचे परवाने बाबत विचारले असता परवाना नसल्याबाबत सांगितले तलवारी जागेस जप्त करून रिक्षा सह इसमास ताब्यात घेण्यात आले आहे पुढील कायदेशीर कारवाई करत आहोत.



# उत्तम पाटील यांना गोल्ड सुवर्णपदक बहाल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नायगाव । प्रतिनिधी

नागपूर येथील डिस्ट्रिक्ट वेंटरन्स स्विमिंग असोसिएशन आणि हनुमान स्पोर्टस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने २५ वी राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत दिनांक २१ व २२ सप्टेंबर २०२४ रोजी एनआयटी स्विमिंग पूल नागपूर येथे आयोजित केलेल्या स्पर्धेत उत्तम धोंडीबा पाटील हाथणीकर यांनी गोल्ड सुवर्णपदक पटकाविले.

कुठलीही जिद्द मनाशी ठेवले की ती सहजपणे हाताळता येते पण सहजपणे हाताळण्यासाठी त्याचे कौशल्य आपल्या अंगी असावे लागते आणि कठोर परिश्रम केले की यशाची शिखर निश्चितच गाठता येतो,म्हणून उत्तम पाटील हातनीकर यांनी २०० मीटर फ्रीस्टाइल मध्ये गोल्ड सुवर्णपदक बहाल झाल्याबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन करीत आहेत. पोहणे हे सर्वात महत्त्वाची व्यायाम आहे शरीरासाठी आणि उत्तम आरोग्यासाठी पाहुणे अत्यंत गरजेचे आहे या युगात अशी जिद्द असणारे फार कमी आहेत म्हणून उत्तम पाटील यांनी हा जो स्पर्धेचा मार्ग निवडला आणि त्यामध्ये यशस्वीरित्या कामगिरी बजावली म्हणून त्यांची सर्व स्तरातून तोंड भरून कौतुक व अभिनंदन होत आहे..






## जनतेच्या मनातील रस्त्यावरचा सर्वसामान्य कार्यकर्ता आपला माणूस

# आंदोलन सम्राट नागवंशी संगपाल पनाड उतरणार मेहकर विधानसभेच्या रिंगणात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोणार । विनायक कुटे

नागवंशी संघपाल पनाड यांची सुरुवात २००६ भारिप बहुजन महासंघ ते वंचित बहुजन आघाडी पर्यंत पासून सुरुवात झाली. कुठलाही राजकीय वारसा नसताना सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये एक आपलं आगळे वेगळे स्थान निर्माण केले.२००६ पासून सक्रिय समाजकारण,राजकारणाला सुरुवात. शेकडो आंदोलने मोर्चे काढत, हजारो गोरगरीब, पिडीत, वंचित ,शोषित, विधवा, अपंग, निराधार, शेतकरी, शेतमजूर, सुशिक्षित बेरोजगार, जनतेला न्याय देण्याचे काम आजपर्यंत करत आहेत. २०१९ च्या लोणार नगरपालिका निवडणूकीमध्ये त्यांच्या नेतृत्वात त्यांनी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारासह दोन नगरसेवकाचे उमेदवार उभे केले. त्यासाठी त्यांनी रात्रीचा दिवस व दिवसाचे रात्र करून चाणक्य नीती वापरून नगराध्यक्ष पदाचा उमेदवार विजयाच्या उंबरठ्यापर्यंत नेत अवघ्या ४०० मताने पराभूत झाला. स्थानिक आमदार खासदार यांच्या उमेदवाराला शह देत शिवसेनेचा उमेदवार तीन नंबर वर ठेवला,

सुलतानपूर हे गाव लोणार तालुक्यातील सर्वात मोठे गाव असून मुंबई नागपूर हायवे वरती वसलेले गाव आहे. स्वातंत्र्यापासून ते २०१९ पर्यंत मागासवर्गीय स्मशानभूमी मध्ये प्रेत यात्रा नेण्यासाठी रस्ता नव्हता या रस्त्याच्या मागणीसाठी अनेक निवेदने मोर्चे उपोषण केले परंतु, निगरगट्ठ प्रशासनाने झोपेचे सोंग घेतल्यामुळे त्या ठिकाणी कुठलेही मार्ग निघला नाही. ही बाब नागवंशी संघपाल पनाड यांच्या जिव्हारी लागली. त्यांनी हा विषय हातामध्ये घेऊन २०१९ मध्ये त्यांचे वडील नामे कचरू राघो पनड यांचे अल्पशा आजाराने निधन झाल्याने त्यांचा अंतिम संस्कार अग्रीडाव सुलतानपूर ग्रामपंचायत कार्यासमोर केला. त्यामुळे गेंड्याच्या कातडीच्या प्रशासनाला जाग आली त्याची दखल घेऊन .त्यानंतर त्या ठिकाणी अंदाजे ३० ते ३५ लाख रुपयांची सिमेंट रस्ता स्मशानभूमीचे काम करण्यात आले. त्यांची गाजलेले आतापर्यंत आंदोलने शेतकऱ्यासंदर्भात महावितरण कारल्यासमोर आमरण उपोषण, शेतकऱ्यासंदर्भात सेंट्रल बँक ऑफ इंडिया बँकेने कर्जमाफी संदर्भात केलेल्या भ्रष्टाचाराच्या आंदोलन, २०२१-२२मध्ये अतिवृष्टीमुळे



झालेल्या नुकसानभरपाईसाठी मुंबई-नागपूर हायवेवर्ती रस्ता रोको आंदोलन, पाणी प्रश्नासाठी शोले स्टाईल आंदोलन, घरकुलधारकाच्या प्रश्नासाठी आमरण उपोषण, अनेक रस्ते नाल्या विकास कामाच्या संदर्भात शेकडो आंदोलन करून, त्यांनी जिल्हाभर आंदोलन सम्राट म्हणून आपली एक आगळीवेगळी ओळख निर्माण केली. २००६ पासून ते आजपर्यंत त्यांच्या अठरा वर्षाच्या कारकिर्दीमध्ये श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांना सर्वस्व मानून रेखाताई ठाकूर, अशोकभाऊ सोनोने,प्रा. धैर्यवर्धन पुंडकर, साहेबराव तायडे,सविता ताई मुंडे, भिमराव तायडे,निलेश भाऊ जाधव, प्रशांत भाऊ वाघोदे, विष्णू भाऊ उबाळे , प्रा.डॉ.के.बी.इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली वाटचाल सुरू आहे. २०१७ मध्ये तालुकाध्यक्ष असताना जिल्हा परिषद पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक लागली त्यामध्ये दोन जिल्हा परिषद सदस्य पदाचे उमेदवार व चार पंचायत समिती सदस्य पदाचे उमेदवार रिंगणात उतरून त्यामध्ये सुलतानपूर सर्कलमध्ये जिल्हा परिषद सदस्य पदाच्या उमेदवार हा माळी समाजाचा देऊन त्यामध्ये अटितटीच्या लढतीमध्ये २२०० मतदान घेऊन तीन नंबर वर राहिला. व पंचायत समिती सदस्य पदाचा उमेदवार मुस्लिम समाजाचा देऊन अवघ्या २०० मताने पराभूत होत दोननंबर राहिला . २०१७ च्या सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये सुलतानपूर तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असून त्यामध्ये पॅनल उभे करून स्वतः ते सरपंच पदाचा उमेदवार म्हणून दोन नंबर वर राहिले अल्पशा मताने पराभूत झाले. त्यांच्यासह पाच सदस्य निवडून आणले. त्यानंतर २०२२ च्या सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये स्वता सह आठ सदस्य निवडून आणले. त्यानचा मतदार संघामध्ये सर्वसामान्य कार्यकर्त्या पासून ते तळागाळातील माणसासोबत दांडगा जनसंपर्क आहे.

जनतेने एक आपला आपल्या मधील आपला हक्काचा माणूस आपले दुःखदर्द जाणणारा तळागाळातील एक सर्वसामान्य कार्यकर्त्याला, विधानसभेमध्ये पाठवले तर नक्कीच मतदार संघामध्ये सुशिक्षित बेरोजगार, शेतकरी, शेतमजूर,शोषित, पीडित, वंचित, अपंग, निराधार, विधवा, सर्वसामान्य जनतेला न्याय देऊन मतदारसंघ विकासाच्या उंबरठ्यावर नेतील. मायबाप जनता जनार्दन आपलाच एक माणूस म्हणून त्यांना पाठबळ द्यावे आपलाच वंचित नेता नागवंशी संगपाल पनाड यांची जनतेला मागणी.

## शुन्यातून उद्योग व्यवसायात विश्व निर्माण करणारे

# अष्टपैलू व्यक्तिमत्त्व उदयोजक मा.मारोतराव पाटील कवळे (गुरुजी)

**मौजे सिंधी हया छोट्याशा गावात एका शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या व पेशाने शिक्षक असलेल्या वडील कै व्यंकटराव पाटील कवळे यांच्या आर्शिवाद व ज्ञानाची तिजोरी घेऊन दुध डेअरी च्या माध्यमातून छोट्या उद्योग सुरू करून अवध्या अल्पवधीत शून्यातून उद्योग व्यवसायात विश्व निर्माण करून गरुड झेप घेणारे नांदेड जिल्हासह बाहेर देशात आपली ओळख निर्माण करणारे यशस्वी उदयोजक म्हणून नावारूपास आलेले अष्टपैलू व्यक्तीमत्व म्हणजे शेतकरी नेते मा. मारोतराव पा. कवळे गुरुजी होत. मारोतराव पा. कवळे गुरुजी यांचा जन्म दि.०१/०१/१९६६ रोजी सिंधी या गावात झाला. त्यांचे शिक्षण बि.ए. डी. एड असून ते पेशाने शिक्षक आहेत.**

१ ते ७ वी पर्यंतचे शिक्षण आपल्या मूळ गावात सिंधी येथे झाले. ८ ते १० वी पर्यंत शिक्षण यशवंत हायस्कुल उमरी येथे झाले. आणि त्यांनी पुढे औद्यागिक प्रशिक्षण संस्था धर्माबाद येथे वायरमन हा ट्रेड पूर्ण केला. त्यापुढे त्यांनी आपल्या पुढील शिक्षणासाठी नांदेड या ठिकाणी गेले आणि त्यांनी नांदेड येथे बि ए. डी. एड शिक्षण पूर्ण केले. १९८८- ९० साली प्राथमिक शिक्षक आणि ८८ ते २०१८ या कालावधीत उच्च प्राथमिक शिक्षक म्हणून ते उमरी तालुक्यात नावाजलेल्या कै बाबासाहेब देशमुख गोरठेकर यांच्या नूतन हायस्कुल उमरी येथे कार्यरत होते, शिक्षणांविषयी व विद्यार्थीविषयी आवड असल्यामुळे गणित विषयाच्या माध्यमांतून ते विदयार्थांच्या आवडीचे शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना आपलेसे होवून समरस झाले. समाजातील गोरगरीब विदयार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य करत असतांना त्यांचे मन शाळेत होते. परंतु समाजातील गोर-गरीब जनता, दीन-दुबळ्यांना आपल्या हातून काहीतरी चांगले कार्य करणे आवश्यक आहे. असे नेहमी कवळे गुरुजीना वाटायचे शेतकरी, शेतमजुर हा स्वावलंबी बनला पाहीजे असे ते नेहमी त्यांच्या मनात खुनगाठ बांधून होती ते आपल्या सहकाऱ्यांना नेहमी चर्चा करायचे आणि तशी चांगली कल्पना त्यांना सुचली आणि चांगला मुहूर्त पाहून आपल्या विचारांची तिजोरी सोबत घेऊन इ.स. २००० साली आपल्या वडीलांकडून ५० हजार रुपये व आर्शिवाद घेऊन त्या पैशांतुन एक गाय विकत घेतली आणि त्या विकत घेतलेल्या एका गाईवर शिंधी या गावात दूध डेअरीची स्थापना केली पहील्या प्रथम एक गाय विकत घेतल्यानंतर डेअरी सुरु करून गावातील लोकाना दुधा विषयी मार्गदर्शन करून हळूहळू डेअरी मध्ये दुध संकलन ५० ते १०० लीटर येवू लागले अशा पद्धतीने सुरुवात करून त्यांनी आपल्या भागातील शेतकरी व शेतमजुर जोडण्याचे काम करीत होते शेतकरी मोठ्या प्रमाणावर जोडले गेले या हेतूने डेअरीची मोठ्या प्रमाणात वाढ होवून दूध संकलनास सुरुवात केली.

गुरुजी यांना वाटु लागले की मी शेतकरी कुटुंबातील आहे. शेतमजूर व शेतकरी यांना गाई म्हशी देण्यासाठी बँकेची गरज भासेल असे त्यांना वाटले व त्यांनी आपली स्वतःची पतसंस्था कै व्यंकटराव पाटील कवळे बिगरशेती सहकारी पतसंस्थेची स्थापना इ.स. २००२ रोजी ६५ हजार रुपये भागभांडवलावर त्यांनी दि. ०५/०७/२००२ कै व्यंकटराव पाटिल कवळे या नावाने पतसंस्था सुरु केली आपल्या पतसंस्थेमार्फत शेतकरी शेतमजूर यांना दोन-तीन वर्षांत म्हशी, गाई वाटप करण्यास सुरुवात करून साईकृपा दूध डेअरी सिधी येथे नावारुपास आणलेली आहे. आज या दूध डेअरीमार्फत दररोज ३५ हजार लिटर दूध संकलीत केले जाते. सिंधी व उमरी तालुक्यातील शेतकरी हा स्वावलंबी बनत चालला आहे. याचे सर्वश्रेय मा. मारोतराव पा. कवळे गुरुजी यांना जाते. गुरुजीनी दूध डेअरीच्या माध्यमातून दूध, पनीर, खवा, दही, तूप, लोणी इत्यादी पदार्थ माफक दरात लोकांना उपलब्ध करून दिलेले आहे.

मा. कवळे गुरुजीनी कै व्यंकटराव पाटील कवळे बिगर शेती पतसंस्था स्थापन करून शेतकऱ्यांना कर्ज वाटप करून त्यांना स्वावलंबी बनवुन एका प्रकारे विकासाची गंगा आपल्या कार्यक्षेत्रात निर्माण केली आहे. सदरील पतसंस्थेचे सभासद ४५०० च्या वर असून जिल्हयात सध्या २० शाखा कार्यरत आहेत. ठेवी ४०० कोटी च्या वर असून जवळपास १५० अधिकारी, कर्मचारी ,कार्यरत आहेत. सदरील संस्थेच्या भरभराटीस मा. चेअरमन मारोतराव पाटील कवळे गुरुजी याचे संचालक, ठेवीदार, सभासद यांचे फार मोठे योगदान आहे.

मा. कवळे गुरुजी हे मुळातच शिक्षण क्षेत्राशी निगडीत असल्याने आपल्या तालुक्यातील गोर-गरिब विद्यार्थाच्या शैक्षणिक सुविधेसाठी इ.स. २०००-२००१ मध्ये श्री. छत्रपती शिवाजी हायस्कूल ढोल उमरी येथे ५ वी १० इयत्तेपर्यंत शाळा सुरु केली. आज त्या शाळेतून गुणवत्तापुर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाते. दरवर्षी इयत्ता १० वी चा निकाल इतर शाळेपेक्षा उत्कृष्ट असा लागतो . शिक्षक व मु.अ. यांच्या समन्वयातून येथिल शाळा गुणवत्तेत वाटचाल करीत आहे. त्याचप्रमाणे उमरी येथे इंग्रजी शाळेतून गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जात आहे. तसेच कारखाना साईड वाघालवाडा येथे व्यंकटराव पाटील कवळे विद्यालय सुरुवात झाले असून मा. गुरुजी यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळेल असा गुरुजींचा मानस आहे.



शेतकरी हा शेतीवर अवलंबुन असतो. शेतकऱ्यांना आपल्या शेतीचे उत्पन्न कसे वाढवता येईल तो शेतकरी प्रगती पथावर कसा जाईल हा दूरदृष्टीकोण डोळ्या समोर ठेवून मा. मारोतराव काळे गुरुजी यांनी सिंधी येथे व्हि. पि. के अँग्रो फूड प्रो. जागरी पावडर या नावाने गुळ कारखान्याची इ.स. २०१६-१७ मध्ये स्थापना केली शेतकऱ्याना ऊसाच्या पिकाकडे वळवून वेगवेगळ्या ऊसाच्या जाती तज्ञ अधिकारी यांच्या मार्गदर्शना खाली शेतकऱ्यांना कारख्यान्या मार्फत ऊस बेणे/ ऊस रोपे याद्वारे वाटप करण्यात आले आहे.

सदरील कारखाना ८०० टी.सी.डी असून दरवर्षी चागल्या प्रमानात क्रशिंग केले जाते याच जागरी पावडरला परदेशात मागनी आहे. ग्रामीण भागातील शेतकरी यांचा कल जास्तीत जास्त उत्पन्न कसे घेता येईल या कडे आहे. शेतकरी आधुनिक शेतीद्वारे वेगवेगळ्या तंत्रज्ञानातून ऊस टनेज कसे काढता येईल याकडे लक्ष देत असतात. मा. मारोतराव कवळे गुरुजी यांच्या मनी एकच ध्यास होता तो म्हणजे आपल्या भागातील शेतकरी, शेतमजूर, तरून बेरोजगार हा स्वतःच्या पायावर उभा राहून स्वतःच्या कुटबासाठी आपली वेगळी ओळक निर्माण करावी हे उदिष्ट डोळयासमोर ठेवून मा. गुरुजींनी पूर्वीचा भाऊराव चव्हान साखर कारखाना हा सप्टेंबर २०२० रोजी विकत घेतला. आणि तोच कारखाना एम. व्हि के अँग्रो फूड प्रॉ. कुसुमनगर वाघलवाडा या नावाने हा कारखाना तीन वर्षा पासून शेतकऱ्याच्या सेवेत कार्यरत आहे. मा. कवळे गुरुजी व त्यांच्या टिम ने (सहकार्यनी) अल्पावधीत सदरील कारखान्यात आमुलाग्र बदल करून आज तो २५०० हजार टी.सी.डी ने चालू आहे. यात शेतकरी, शेतमजुर, ठेकेदार अधिकारी कर्मचारी आणि ऊस तोड कामगार यांच्या योग्य नियोजनानुसार सदरील कारखाना योग्य रीतीने वाटचाल करत आहे.

एम व्हि के ॲग्रो फूड प्रा. लि कुसुमनगर वाघलवाडा येथे संजिवनी ऊस बेणे रोप वाटिका मा. कवळे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असून वेगवेगळ्या जातीचे ऊस बेणे रोपे सदरील रोपवाटीकेत शेतकऱ्यांना मापक दरात पुरवठा केले जाते जसे को-८६०३२, व्हि एस आय ८००५, एम एस १०००१, को सी ६७१ असा विविध जातीचे नीरोगी व शुध्द दर्जाचे ऊस रोपे शेतकऱ्याना दिले जातात तसेच कारखान्यामार्फत ठिबक सिंचन योजना देखिल शेतकऱ्यांना माफक दरात पुरविले जाते या वर्षी कार्यक्षेत्रात ऊसाची लागवड शेतकऱ्यांनी केलेली असुन शेतकरी हा निसर्गाच्य लहरीपणामुळे जास्तीत जास्त ऊस लागवडीकडे वळत आहे.

मा. मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांच्या कल्पक बुध्दीमतेतुन व उच्च विचार संरणी व समाजाप्रती असलेली निष्ठा यामुळे गुरुजीनी शेतकऱ्यांसांठी वाघलवाडा येथे नविन एक जागरी पावडरचा दुसरा युनिट हे डॉ. शंकरराव चव्हाण जागरी पावडर प्रॉ. लि., कुसुमनगर वाघलवाडा या नावाने आक्टोंबर २०२२ मध्ये प्रत्यक्ष चाचणी गळीत हंगामात सुरवात झालेली आहे. सर्व शेतकरी, शेतमजुर, ऊस उत्पादक यांच्यासाठी निश्चितच आभिमानाची व अभिनंदनिय आहे. मा. मारोतराव पाटिल कवळे गुरुजी यांनी उद्योग क्षेत्रात उत्तुंग अशी भरारी घेतली असुन त्यांचा सामाजिक कार्यात देखील आतिशय महत्वाचे योगदान आहे. गुरुजी हे जि.प. सदस्य असतांना त्यांनी उमरी तालुक्यातील सर्व जि. प. शाळेना संगणक संच इनव्हेटर इ. सुविधा पुरविल्या आहेत. त्यामुळे इ.स. २०१७-१८ मध्ये तालुक्यातील सर्व जि.प. शाळा ह्या डिजिटल शाळा म्हणुन नावारुपास आलेल्या आहेत. यात सरांचे मोठे योगदान आहे. कै. व्यंकटराव पा. कवळे पतसंस्थे तर्फे गुरुजींनी आकस्मित निधिच्या स्वरुपात गोरगरीब कुटुंबातील व्यक्तींना नेहमी मदत करत असतात. दोन वर्षा पुर्वी शेतकऱ्यांना तळ्यातील गाळ काढून शेतात विनामुल्य टाकन्याचे काम सरांच्या सामाजिक उपक्रमांचा एक भाग आपनास पहावयास मिळतो. तसेच गुरुजी फाउंडेशन या नावाने नवीन सामाजिक संस्था कार्यान्वित करून नायगाव विधान सभा मतदार संघातील गरजू व अपती ग्रस्तांना या संस्थे मार्फत लोकांना मा. कवळे गुरुजी यांच्या तर्फे मदत केली जाते.

मा. मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी सामाजिक कार्यामध्ये भरीव असे कामे करत असतांना त्यांनी आपल्या राजकिय जिवनाची सुरुवात अतिशय योग्य पाधतिने करीत असून नायगाव, धर्माबाद, उमरी या तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर यांच्या साठी सत्तेत नसताना सुद्धा आजतागायत जवळपास ५ हजार कर्मचारी गुरुजी कडे कार्यरत आहेत. शेतकरी यांच्या साठी नवीन नवीन प्रयोग करून शेतीमध्ये अमुलाग्र बदल घडून आनात आहेत. अशा कर्तृत्ववान नेतृत्वास लोकांनी लोकप्रतिनिधी म्हणून निवड केल्यास आपल्या भागाचा विकास नक्की होईल.

मा. मारोतराव व्यंकटराव कवळे पाटील गुरुजी यांचा सामाजिक व राजकिय प्रवास पहाता इ.स. १९८८ पासुन ते आजतागायत गुरुजी नेहमी शेतकरी, शेतमजुर, बेरोजगार यांच्यासाठी अहोरात्र मेहनत घेतलेली आहे. दुध डेअरो तिन्ही कारखाने पतसंस्था याचे चेअरमन या नात्याने गुरुजींनी हजारो तरुनांच्या हाताला काम दिलेले आहे. शेतकरी हा सुजलाम सुफलाम करण्याचे ध्येयच गुरुजींनी मनाशी बाळगलेले आहे. आपल्या या समाजा प्रती बांधीलकीशी समरस झाल्याचे दिसुन येते व शेतकरी कष्टकरी कामगार यांच्या विषयी आपले नाते वरचे वर वृधिंगत होत चाललेले आहे. आपल्या या दुर दृष्टीच्या विचारसरणीचे स्वागत सर्व समाज घटकातुन होत आहे. आपली अशीच उत्तरोत्तर प्रगती होवो ही आपेक्षा व सदिच्छा व्यक्त करतो.

**-यु.जी. कदम**
**सामाजिक कार्यकर्ता धर्माबाद तालुका**

## कोतवाल संघटनेचे चतुर्थश्रेणीच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय समोर एकदिवसीय धरणे आंदोलन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

कोतवाल पद हे प्राचीन काळापासून भारतात अस्तित्वात आहे त्यांचे मुख्य काम गावात किंवा शहरांमध्ये कायदा आणि सुव्यवस्था राखणे गावात शांतता राखणे व प्रशासनाचे इत्तर कामांमध्ये मदत करणे असे होते पण आताच्या काळामध्ये गावपातळीपासून ते तहसील कार्यालयातील सर्वच कामे आता कोतवाल हे करत आहेत तहसील कार्यालय साप सफाई करणे निवडणुकीमध्ये रात्रभर काम करणे पेट्या उचलणे टपाल वाटप करणे तहसील कार्यालयाची साफसफाई करणे असे अनेक इत्यादी काम कोतवालाकडून करून घेतले जातात परंतु त्यांना तुटपुंज मानधनावर काम करावे लागत आहे गुजरात राज्यामध्ये कोतवाल संवर्गातील पदाला चतुर्थी श्रेणी लागू आहे पण महाराष्ट्रात कोतवालांना चतुर्थ श्रेणी





लागू नाही महाराष्ट्रत कोतवालांना संवर्गाची मुख्य मागणी चतुर्थश्रेणीचा दर्जा लागू करणे, मानधनांमध्ये वाढ करणे, व इतर प्रलंबित मागण्या बाबद कार्यवाई चालू आहे ते जलत गतीने पूर्ण होऊन आमच्या मागण्या मान्य करण्यात यावे केवळ शासनाने लक्ष वेधण्यासाठी राज्य कोतवाल संघटनेचे राज्यभर आंदोलन आहे

कोतवाल संघटनेचे विविध मागणीसाठी दिनांक २४ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड समोर धरणे आंदोलन करण्यात आले आहे आमच्या मागण्या दोन दिवसांत मान्य नाही झाल्यास २६ सप्टेंबर रोजी मंत्रालय समोर हजारोच्या संख्येने आंदोलन करण्यात येईल असा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे यावेळी कोतवाल संघटनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष या सुधाकर डोईवाड, जिल्हा उपाध्यक्ष संजय केंद्र, जिल्हा सचिव राजेश राठोड, बिलोली तालुका अध्यक्ष माधव कांबळे, वैशाली भुरे, शरद शिवशेट्टे, शिवराज मुंडकर,हिमायतनगर तालुका अध्यक्ष हरीश गिरी, उपाध्यक्ष गजानन आडे, सचिव विशाल सावते मुखेड तालुका अध्यक्ष मा. राजेश जाधव. मुखेड उपाध्यक्ष रुपाली वाघमारे, सचिव माधव गायकवाड, विद्या कांबळे, वंदना सोनकांबळे, मीना तोटेवाड, मधुकर चव्हाण, अनुपमा खानापुरे, वसंत गायकवाड, शरद नरभागे ,संदीप गायकवाड, परदीप गुपनरे, बालाजी गायकवाड, बालाजी राजुरे, देगलुर ता.अध्यक्ष गायकवाड पी. जे., उपाध्यक्ष इबीते व्ही.एन, सचिव विधमवार, मुदखेड ता. अध्यक्ष कैलास भांगे, गजानन कोकणे, कंधार जिलानी शेख, रामेश्वर तांबुळे आदी कोतवाल संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते

## भगवान परशुराम आर्थिक विकास मंडळ स्थापन केल्या बद्दल महायुती सरकारचे नायगाव येथे अभिनंदन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील महायुती सरकारने २३ सप्टेंबर रोजी मंत्री मंडळ निर्णयात भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून आर्थिकदृष्ट्या दुर्बल ब्राह्मण समाजा करीता गेल्या अनेक दिवसा पासून प्रलंबित मागणीची दखल घेऊन यशस्वी निर्णय घेतल्या बद्दल नायगाव ब्राह्मण महासंघ च्या वतीने भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करून महायुती सरकारचे अभिनंदन करून ,फटाके वाजवून व पेढे वाटून आनंद व्यक्त करण्यात आला या वेळी आ.भा.ब्राह्मण महासंघ जिल्हाध्यक्ष ग्रा.बाळासाहेब पांडे मांजरमकर,तालुका अध्यक्ष प्रसाद देसाई,ज्येष्ठ सलागार श्याम कुलकर्णी,मंगेश देशपांडे,सुनील जोशी,युवा अध्यक्ष रोहन जोशी,उमेश महाराज नायगाव कर,नागठाणे सर,वे. शा.स.शाहू महाराज या सह ब्राह्मण महासंघ कार्यकर्ते उपस्थित होते.या वेळी युती सरकारने आनेक् दिवसा पासून प्रलंबित प्रश्न मार्गी लावून ब्राह्मण समाज उन्नती साठी प्रयत्न केल्या बद्दल शासनाचे ऋण व्यक्त करण्यात आले.संचलन श्याम कुलकर्णी यांनी तर आभार मंगेश देशपांडे यांनी मानले.

## विविध मागण्यासाठी धर्माबाद उपविभागीय कार्यालयावर शेतकऱ्यांचा बैलगाडीसह मोर्चा ; हजारो शेतकऱ्यांची उपस्थिती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने दिनांक २४ सप्टेंबर २०२४ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. शेतकरी संघर्ष विकास समितीच्या वतीने उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे यांना निवेदन देण्यात आले.

१. धर्माबाद तालुक्यात गोदावरी नदीच्या काठावरील व तालुक्यातील विविध ओढे नाले ओहोळ यांनी नुकसान बाधित झालेल्याना १०० टक्के नुकसान भरपाई त्वरित मिळावी.

२.सन २०२३ सह २०२४ चाही पिक विमा मंजूर करा व गतवर्षीच्या पीक विम्याची ७५ टक्के रक्कम त्वरित मिळावी.





३. संभाजीनगर येथील कॅबिनेट बैठकीत झालेल्या ठरावाप्रमाणे बाभळी बंधारा बॅक वाटरणे बूडीत शेतकऱ्यांचे त्वरित नुकसान भरपाई देण्यात यावी.

४.धर्माबाद तालुका ओला दुष्काळ जाहीर करणे, सरसकट पिक विमा लागू करणे, बाभळी बंधारा बॅक वॉटर मुळे शेतीच्या झालेल्या नुकसानाचे तात्काळ भरपाई मिळावी, बाभळी बंधारा बुडीत क्षेत्राचे प्रलंबित असलेला मावेजा वाटप करण्यात यावे.

५. महात्मा ज्योतिबा फुले कर्जमुक्ती मध्ये २०१९ मध्ये मयत शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले असून त्यांच्या वारसांना नवीन पीक कर्ज व बेबाकी प्रमाणपत्र मिळवून देण्यात यावे. यासह अनेक प्रमुख मागण्याचे निवेदन देण्यात आले उपविभागीय अधिकारी कार्यालय ,तालुका कृषी अधिकारी, तहसीलदार मॅडम,ईतर विभागाशी निगडित असलेल्या शेतकऱ्यांच्या मागण्या कडे शासनाने तातडीने लक्ष घालून त्या मागण्या सोडवण्यात यावे अशी मागणी निवेदनात करण्यात आली. धर्माबाद तालुक्यांतील शासकिय कार्यालयाशी निगडित जे विषय असतील ते तातडीने सोडवण्यात येतील इतर ज्या मागण्या आहेत ते शासनाकडे पाठविण्यात येईल व ते पूर्ण होण्यासाठी जो पाठपुरावा अपेक्षित आहे तो करण्यात येईल असे आश्वासन यावेळी उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे यांनी दिले आहे. कोणताहि अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. या आंदोलनात शहरासह ग्रामीण भागातील हजारो शेतकरी सहभागी झाले होते.

# सत्यशोधक समाज ही मानवतावादी व मानव मुक्तीची विधायक चळवळ–प्रा.श्रीकृष्ण बनसोड

## सत्यशोधक समाज समितीच्या अध्यक्षपदी मा.श्री विनोद इंगळे यांची निवड




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अमरावती । प्रतिनिधी**

सकल बहुजन समाजाला धर्मांध शक्तीच्या जुलमी शोषणातून बाहेर काढून त्यांना बुद्धीप्रामाण्यवादी शिकवण देण्यासाठी महात्मा फुले यांनी दि .२४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली.या सत्यशोधक समाजाचा १५१ वा वर्धापन दिन महात्मा फुले पूर्णाकृती पुतळा चौक ( चित्रा चौक ) अमरावती येथे उपेक्षित समाज महासंघ व फुले – शाहू – आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित होऊन कार्य करणाऱ्या विविध संस्था व संघटनांच्या वतीने दि.२४ सप्टेंबर २०२४ ला संपन्न झाला.
कार्यक्रमाचे अध्यक्ष समाजभूषण प्रा.श्रीकृष्ण बनसोड (अध्यक्ष,उपेक्षित समाज महासंघ ),प्रमुख वक्ते प्रा.अरुण बुंदेले,(अध्यक्ष कै.मैनाबाई बुंदेले स्मृती प्रतिष्ठान ),प्रमुख अतिथी युवा पत्रकार श्री विनोद इंगळे, प्रा.डॉ.नरेशचंद्र काठोळे (अध्यक्ष डॉ.पंजाबराव देशमुख अकादमी ),कामगार नेते श्रीकृष्णदास मोहोरे,अॅड.प्रभाकर वानखडे,संजयराव राऊत,रमेशराव राऊत,गणेशराव मानकर,वसंतराव भडके,राम कुमार खैरे होते.सर्वप्रथम महात्मा फुले यांच्या पूर्णकृती पुतळ्याला हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.अभंगकार प्रा.अरुण बुंदेले यांनी अभंग तरंग या स्व काव्यसंग्रहातील क्रांतिसूर्य या अभंगाचे गायन करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. याप्रसंगी कामगार नेते श्रीकृष्णदास माहोरे ,श्री संजय राऊत यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे संचालन ड.प्रभाकर वानखडे तर आभार श्री गणेश मानकर यांनी मानले . कार्यक्रमाला शरद सरोदे , करीमउद्दीन,कुलदीप चौरे ,गणेश रिठे तसेच फुले – शाहू – आंबेडकरी अनुयायी बहुसंख्येने उपस्थित होते.

### मा .श्री विनोद इंगळे यांचा सत्कार सत्यशोधक समाजाच्या स्थापना दिनी

**सत्यशोधक समाज समिती च्या अध्यक्षपदी युवा पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते मा.श्री विनोद इंगळे यांची सर्वानुमते निवड करण्यात येऊन त्यांचे पुष्पगुच्छ व प्रा.बुंदेले लिखित अभंग तरंग व प्रा.बनसोड लिखित महात्मा फुले व अस्पृश्यांची कैफियत ही पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला.नियुक्ती झाल्याबद्दल सर्व मान्यवरांनी त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.**

**अध्यक्ष सत्यशोधक प्रा. श्रीकृष्ण बनसोड यांनी ,महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाची चळवळ ही मानवतावादी व मानवमुक्तीसाठी जीवनमूल्य देणारी विधायक चळवळ आहे.सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी मानवतावाद,व्यक्तिस्वातंत्र्य, समता,बंधुता,न्याय या शाश्वत मूल्यांचा पुरस्कार करणारी आहे. असे विचार व्यक्त केले.**

### महात्मा फुलेंचा सत्यशोधकीय विचार तळागाळा पर्यंत पोहोचवणे आवश्यक–श्री विनोद इंगळे

**नवनियुक्त सत्यशोधक समाज समितीचे अध्यक्ष व प्रमुख अतिथी युवा पत्रकार श्री विनोद इंगळे यांनी , सत्यशोधकीय विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा मी निर्धार करतो.सत्यशोधक समाज चळवळ केवळ अमरावती जिल्ह्यापूर्ती मर्यादित न राहता त्याचा प्रचार व प्रसार मी सर्वदूरपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करेल. असे विचार व्यक्त केले.**

### सत्यशोधक तळवळ गतिशील होणे आवश्यक–प्रा.नरेशचंद्र काठोळे

**प्रमुख अतिथी प्रा.डॉ. नरेशचंद्र काठोळे यांनी , विविध प्रकारच्या शोषणाचा प्रतिकार करण्यासाठी बहुजन समाज संघटित व्हावा यासाठी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. ही सत्यशोधक समाजाची चळवळ गतिशील करण्याचे कार्य प्रा.श्रीकृष्ण बनसोड यांच्या नेतृत्वात सुरू असून आज अशा कार्याची समाजाला गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.**

### बहुजन समाजाला आज संघटित होण्याची गरज–अॅड.प्रभाकर वानखडे

**प्रमुख अतिथी ड.प्रभाकर वानखडे यांनी , भरकटलेल्या बहुजन समाजाला आज संघटित होण्याची गरज आहे आणि यासाठी आज महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाचे कार्य गतिशील करण्याची गरज आहे . असे प्रतिपादन केले.**

### वैचारिक गुलामीतून मुक्त करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना–प्रा.बुंदेले

**प्रमुख वक्ते साहित्यिक प्रा.अरुण बुंदेले यांनी , महात्मा फुलेंच्या काळात बहुजन समाज हा विविध प्रकारच्या परंपरागत रुढी व अंधश्रद्धांमुळे वैचारिक गुलाम झाला होता.त्यांना या वैचारिक गुलामीतून मुक्त करण्यासाठी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली आणि सामाजिक व धार्मिक अन्यायाविरुद्ध सतत लढा दिला.आज सत्यशोधक समाज समितीच्या अध्यक्षपदी निवड झालेले मा.श्री विनोद इंगळे यांनी ही सत्यशोधक समाजाची चळवळ पुढे नेण्याचा आज निर्धार केलेला आहे,त्यांच्या या कार्याला यश लाभो ही मनस्वी सदिच्छा . असे विचार व्यक्त केले.**

# लेंडीतलाव प्रकल्पा ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतुळा उभारण्यात यावा–प्रा.बळीरामजी मापारी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार सरोवर । विनायक कुटे**



सथानिक कृऊबा समितीत शिवसेनेच्या वतीने शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा. बळीरामजी मापारी यांनी दि. २३ सप्टेंबर रोजी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी त्यांनी सांगितले कि प्रसिध्द लेंडीतलावाच्या प्रकल्पासाठी आमदार संजय रायमूलकर यांच्या प्रयत्नातून १७ कोटी ४६ लाख रुपये मंजूर झाले आहेत. याठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य आश्वरूढ पुतुळा उभारण्यात यावा.


पुढे बोलताना त्यांनी सांगितले कि लेंडीतलाव पुनर्रजीवन , संरक्षक भिंतीचे बांधकाम , पॅरापीट रेलिंग , कॉंक्रिट रस्ता , नाल्या बांधकाम , पदपथ , इमारत , सांडवा , पूल ,जीम , लहान मुलांना खेळण्यासाठी बालोद्यान , फेब्रिक टेंट आदी कामे या प्रकल्पासाठी होणार आहेत .लोणार वासीयांच्या भावना लक्षात घेऊन गेल्या ३० वर्षा पासून छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतुळा लोणार शहरात उभारावा यासाठी प्रयत्न सुरु होते. लेंडीतलाव प्रकल्पा ठिकाणी सुटसुटीत जागा उपलब्ध असल्याने मध्यभागी छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वरूढ पुतुळा उभारण्यात यावा यासाठी नामदार प्रतापरावजी जाधव व आमदार डॉं. संजयजी रायमूलकर यांनी मंजुरात मिळून द्यावी. जागतिक दर्जाच्या लोणार शहराच्या सौदर्यात भर पाडावी असे शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा. बळीरामजी मापारी यांनी सांगितले. यावेळी शिवसेना तालुका प्रमुख भगवान पाटील सुलताने, युवासेना प्रमुख गजानन मापारी, मा. नगरसेवक डॉं. अनिल मापारी, सुबोध संचेती, डॉं. काशीनाथ घुगे यांची उपस्थिती होती.

### मलठण येथे ६ एकर ऊस जळून खाक

# महावितरण च्या गलथान कारभारा मुळे शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**



मलठण ता.दौंड येथील पांडुरंग रघुनाथ देवकाते यांचा ६ एकर ऊस विजेच्या तारा तुटून पडल्याने जळून खाक झाला आहे.त्यामुळे त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे,या ठिकाणी विजेच्या तारा बऱ्याच दिवसापासून खाली लोंबकळत होत्या याबाबत वेळोवेळी महावितरणच्या अधिकाऱ्यांना सांगून देखील काहीही दुरुस्तीसाठी उपाय योजना केलेली नाही,त्यामुळे महावितरण च्या गलथान कारभारामुळे शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

शेतकरी पांडूरंग देवकाते यांनी वेळोवेळी तोंडी सांगून देखील महावितरणच्या अधिकाऱ्यांनी कसलीही दूरुस्थिती केली नाही. त्यामुळे मलठण परिसरात महावितरण कंपनीच्या विरोधात संताप व्यक्त केला जात आहे.यावेळी पांडुरंग देवकाते म्हणाले की महावितरण चे अधिकारी यांना वेळोवेळी सांगून देखील त्यांनी दुर्लक्ष केल्याने माझा ऊस जळाला आहे.त्यामुळे मला शासनाकडून योग्य ती मदत तात्काळ मिळावी.

यासंदर्भात गाव कामगार तलाठी सोनवणे यांना संपर्क केला असता ते म्हणाले की संबंधित ६ एकर क्षेत्राचा ऊस जळीताचा पंचनामा केला असून तो वरिष्ठांकडे पुढील कारवाईसाठी पाठवण्यात आला आहे.

# तालुक्यातील काष्टी येथील मुस्लिम बांधवांन कडुन कौतुकास्पद उपक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**



आपले गाव स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी व गावातील सामान्य लोकांचे वेळेवर काम करुण समाधान देणार्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा गावातील मुस्लिम बांधवांनी एकत्र येवून पुरुष व महिला कर्मचारी यांना साडीचोळी,पूर्ण पोशाख व मिठाई देवून आदरपूर्वक सन्मान केल्याने कर्मचारी भारावून गेले.
दि.२३ रोजी श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील भैरवनाथ मंदिरामध्ये हजरत मुहंमद पैगंबर जयंतीनिमित्त गावातील मुस्लिम बांधवांनी एकत्र येत आपण समाजात शांततेचा व एकोपाचा संदेश देत गेली वर्षभर महिला सफाई कामगार व ग्रामपंचायत ऑफिस कर्मचारी २९ जनांना एकत्र बोलावून त्यांना पूर्ण पोशाख,साडीचोळी मिठाई देवून सन्मान केला.
यावेळी कार्यक्रमाला जेष्ठ नेते माजी सभापती अरुणराव पाचपुते, सहकार महर्षी संस्थेचे अध्यक्ष राकेश पाचपुते, बाजार समितीचे माजी सभापती वैभव पाचपुते, नागवडे कारखाना संचालक बंडू जगताप, डॉ.अनिल कोकाटे, चांगदेव पाचपुते, आशा खोसे, यांनी मुस्लिम बांधवांच्या सुंदर उपक्रमांचे कौतुक करुण आभार मानले.
कार्यक्रमाला व्यापारी असोसिएशन अध्यक्ष संजय काळे, उपसरपंच नितिन ढमे, लालासाहेब फाळके, संचालक सर्जेराव पाचपुते, मेहेबुब शेख, राजुभाई तांबोळी, मौलाना शेख,अकबर बागवान,शकुर जकाते,फिरोज शेख,इरफान बागवान, गजानन जाधव, वसंत पालकर,असिफ जामदार,अन्सार पठाण यांच्यासह मान्यवर पदाधिकारी कार्यकर्ते ग्रामस्थ मोठ्या संख्येने हजर होते. प्रास्ताविक जमीर शेख यांनी करुण सुत्रसंचालन रफिक इनामदार यांनी केले तर शेवटी ग्रामसेवक शरद कवडे यांनी आभार मानले. आजपर्यंत गावात सफाई कर्मचारी याचा कोणीही सन्मान केला नव्हता परंतु मुस्लिम बांधवांनी केलेल्या सन्मानामुळे महिला सफाई कामगार याच्या डोळ्यात आनंद आस्रु पहायला मिळाले.

### सर्व जातीधर्माच्या लोकांनी मज्जित मध्ये यावे.

**देशात प्रत्येक समाजाचे श्रध्दास्थान म्हणून देव,गुरु, मार्गदर्शक वेगवेगळे आहेत.पण आपण सर्व एक आहोत.अनेकांना मुस्लिम समाजाबद्दल मनात संशय व शक्ना निर्माण होते.कि मुस्लिम बांधव मज्जित मध्ये जावून काय करतात. कारण आमच्या मध्ये जेवढा एकोपा आहे.तेवढा कोणत्याही समाजात नाही. तोच एकोपा सर्व समाजामध्ये निर्माण होण्यासाठी सर्वांची प्रगती विकास होण्यासाठी आम्ही एकत्र येवून चर्चा करुण मार्ग काढतो. हे समजण्यासाठी प्रत्येक समाजातील व्यक्तीने एकदा तरी मज्जित मध्ये येवून भेट द्यावी.**
**–जमीर शेख काष्टी.**

# स्थानिक इंदिरा गांधी उर्दू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय लोणार येथे सत्कार




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

जगाला शांती व समृद्धी चा संदेश देणारे इस्लाम धर्माचे शेवटचे पैगंबर हजरत मोहम्मद(सल्लाहो अलैही व सल्लम) यांच्या जयंतीच्या पावन पर्वावर जिल्हास्तरीय सिरत क्वीज चे जमीयत उलमा –ए हिंद लोणार तथा झाकीर हुसेन उर्दु हायस्कूल लोणार यांच्या तर्फे आयोजन करण्यात आले होते यामध्ये स्थानिक इंदिरा गांधी उर्दू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय लोणार चा विद्यार्थी मोहम्मद ज़ैद मोहम्मद रीज़वान* याने प्रथम क्रमांक प्राप्त करून उमराह (मक्का मदिना यात्रा) हे बक्षीस प्राप्त केले. याबद्दल मोहम्मद ज़ैद मोहम्मद रीज़वान तसेच त्याचे वडील मोहम्मद रीज़वान मोहम्मद नासेर यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.मुख्याध्यापक शेख तौफिक सर यांच्या हस्ते शाल व पुष्पगुछ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मोहम्मद ज़ैद याने आपल्या यशाचे श्रेय आई वडील तथा शाळेच्या शिक्षकांना दिले, मोहम्मद रिजवान यांनी सर्वांनी पैगंबर हजरत मोहम्मद (सल्लाहो अलैही व सल्लम) यांचे विचार आत्मसात करावे असे सांगितले तसेच मुख्याध्यापक शेख तौफिक यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार व्यक्त केले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904